पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१३/०४/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१३/०४/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. गोफणे अनुराधा देविदास
२) मा. जवळकर वैशाली राहुल
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. शितोळे शैलजा बाबुराव
५) मा. लांडे श्रध्दा बाजीराव - सभाध्यक्ष
६) मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर
७) मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.आंबवणे – कार्यालय अधिक्षक (माध्यमिक शिक्षण विभाग) मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.अनुराधा गोफणे

सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती हे सभागृहात उपस्थित नसल्याने मा.महिला व बालकल्याण समिती सदस्य मा.लांडे श्रध्दा बाजीराव यांची सभाध्यक्ष म्हणून निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(मा.लांडे श्रध्दा बाजीराव यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) महिलांसाठी ज्ञान कौशल्यवाढ कार्यक्रमाचे आयोजनाबाबत (२०१६-१७) – मा.अनुराधा गोफणे, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २३/०३/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : १५ विषय क्रमांक : १

दिनांक : १३/०४/२०१६

सुचक : मा.अनुराधा गोफणे अनुमोदक : मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ :- मा.अनुराधा गोफणे, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला, मुले/मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यातील महिलांसाठी " ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " ही एक योजना असून गेल्या तीन वर्षापासून मनपा स्तरावर राबविण्यात येते. तसेच सदरची योजना ही गेल्या तीन वर्षापासून मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चांगल्या प्रकारे राबविली आहे. आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठया प्रमाणावरील कामकाज करणेसाठीची आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेष करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वस्तीपातळीवरील प्रशिक्षण घेण्याचा मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला भरपूर अनुभव आहे. त्यानुसार तातडीने योजना सुरु होणेकामी, तसेच संस्था निवडीसाठी लागणारा प्रदिर्घ कालावधीचा विचार करता व पुढील वर्षी होणा-या मनपातील मा.नगरसेविका / मा.नगरसेवकांच्या निवडणुकीची संभाव्य आचारसंहिता चालू आर्थिक वर्षात लागणेपूर्वी प्रशिक्षणाचे कामकाज सुरु असावे, प्रशिक्षणास इच्छूक असलेली कुठलीही महिला प्रशिक्षणापासून वंचित राहू नये, प्रशिक्षण लवकरात लवकर सुरु व्हावे या उद्येशाने मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचे मार्फत थेट पध्दतीने मनपास्तरावर मागील वर्षीच्याच प्रशिक्षण विषयांचे व त्याच अभ्यासक्रमानुसार एकुण बारा प्रशिक्षण विषयांचे प्रशिक्षण हे मागील वर्षीच्याच महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) व दरानुसार, सोबतच्या प्रपत्र "अ" मधील नमुद तपशिलानुसार दि.३१/०३/२०१७ अखेरपर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे. मागील वर्षीच्याच दरात चालू वर्षी प्रशिक्षण दिल्याने म्हणजे प्रति लाभार्थी प्रशिक्षण शुल्कात वाढ होणार

नसल्याने मनपाचे आर्थिक हितच साधले जाणार आहे. सदरची योजना ही मनपास्तरावर मनपाच्या या पूर्वीच्या मान्यता (धोरण)/कार्यपध्दतीनुसार अटी व शर्तीनुसार राबविण्यास व मागील वर्षी प्रमाणेच चालू वर्षी देखील " महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत " प्रशिक्षणात भाग घेणा-या महिलांना एकापेक्षा अधिक प्रकारच्या विषयांचे प्रशिक्षण घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल/दुरुस्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो.यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. व सदर योजनेवर होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात " महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत " या उपलेखाशिर्षासह एकूण ३९ उपलेखाशिर्षांचा समावेश आहे. तरी " महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत " या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत ३८ उपलेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतूदींमधून सदर योजनेसाठी लाभार्थींच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे वाढीव खर्चाकामी आवश्यकतेनुसार रकमा वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे व त्यानुसार सदर योजना मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि.३१/०३/२०१७ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लांडे श्रध्दा बाजीराव )**
**सभाध्यक्ष**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२१३/२०१६
दिनांक : १६/०४/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

महिला व बालकल्याण योजना

महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम सन २०१६-१७

प्रपत्र – “अ”

( ठराव क्रमांक १५ दि.१३/०४/२०१६ चे लगत )

| अ.क्र. | विषयाचे नांव | शैक्षणिक पात्रता (अर्हता) | कार्यक्रमाचा कालावधी दररोज २ तास | | प्रति लाभार्थी एकूण प्रशिक्षण शुल्क र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिवस | तास | |
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| १ | स्पोकन इंग्लिश. | ७ वी पास | ३० दिवस | ६० तास | १,५००/- |
| २ | ब्युटीकल्चर व हेअर डिझायनिंग. | साक्षर | ७५ दिवस | १५० तास | ४,५००/- |
| ३ | दुग्धजन्य पदार्थ तयार करणे. | ८ वी पास | ३० दिवस | ६० तास | १,८००/- |
| ४ | अडव्हान्स गिफ्ट आर्टीकल्स निर्मिती, ज्वेलरी तयार करणे व फर टॉईज तयार करणे, (केमिकल फ्लॉवर, सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटींग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इ.) | साक्षर | ७० दिवस | १४० तास | ४,२००/- |
| ५ | विविध प्रकारच्या मेणबत्ती, अगरबत्ती, धुप, सुगंधी उटणे, फेस पॅक, सुगंधी तेल, शॅम्पु, अत्तरे, हर्बल मेहंदी तयार करणे. | ५ वी पास | २५ दिवस | ५० तास | १,२५०/- |
| ६ | प्लेग्रुप टिचर्स प्रशिक्षण | १० वी पास | ३० दिवस | ६० तास | १,५००/- |
| ७ | घरगुती वापरातील पदार्थ तयार करणे व बेकरी उत्पादने (विविध मसाले, शेवई, लोणची, पापड इ.) | साक्षर | ३० दिवस | ६० तास | १,५००/- |
| ८ | सेल्सगर्ल प्रशिक्षण | १० वी पास | ३० दिवस | ६० तास | १,५००/- |
| ९ | बालसंगोपन प्रशिक्षण | १२ वी पास | ३० दिवस | ६० तास | १,५००/- |
| १० | पेपर कन्व्हर्जन | ५ वी पास | ६० दिवस | १२० तास | ३,०००/- |
| ११ | रुग्ण सेविका प्रशिक्षण | ८ वी पास | ३० दिवस | ६० तास | १,८००/- |
| १२ | केटरींग व्यवस्थापन | साक्षर | ३० दिवस | ६० तास | १,८००/- |

सही/-

(लांडे श्रध्दा बाजीराव)

सभाध्यक्ष

महिला व बालकल्याण समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.